17 OCT 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टॅनफोर्डच्या यादीत शिवाजी विद्यापीठाचे दहा संशोधक

कोल्हापूर, ता. १६ : जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाच्या दहा संशोधकांना मानांकन मिळाले आहे. यात पदार्थविज्ञान अधिविभागातील चार संशोधकांसह २५ माजी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने त्यांची नवी यादी जाहीर केली.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गत वर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीत विद्यापीठाच्या संशोधकांना स्थान मिळाले होते. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. यादीत प्र-कुलगुरू प्रा. पी.एस. पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), प्रा. ए.व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. एस.पी. गोविंदवार (पदार्थविज्ञान), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. ए.व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनो तंत्रज्ञान), प्रा. के.एम. गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स) यांचा समावेश आहे.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या यादीसाठी १९६० ते २०२२ दरम्यान संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर विचार करण्यात आला. २२ विज्ञान विषय आणि १७६ उप विषयांमधील संशोधनाची दखल त्याअंतर्गत घेतली गेली. शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक काटेकोर निकषांवर आधारित ही यादी जाहीर झाली.

विशेष म्हणजे २०२२च्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या डेटाबेसमध्ये विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाचे चार शिक्षक आणि तब्बल २५ माजी विद्यार्थी झळकले आहेत. त्यापैकी बहुतेकजण आता परदेशात पोस्ट डॉक्टरेट करत आहेत.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते संशोधकांचा सत्कार झाला. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले.

## यादीतील सन्माननीय

करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. पाटील, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी.डी. लोखंडे, अधिविभागप्रमुख डॉ. राजपुरे, डॉ. आर. एस. माने, डॉ. बी. आर. संकपाळ, डॉ. दीपक डुबल आणि डॉ. संभाजी एस. शिंदे, तर वार्षिक कामगिरीच्या डेटाबेसमध्ये डॉ. ए.व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. देवण, डॉ. व्ही. एल. मथे, डॉ. एच. एम. पठाण, डॉ. एस. एम. पवार, डॉ. आर. आर. साळुंखे, डॉ. वाय. एम. हुंगे, डॉ. एस. एस. माळी, डॉ. आर. सी. कांबळे, डॉ. एस. एस. लट्ठे, डॉ. एन. आर. चोडणकर, डॉ. एस. जे. पाटील, डॉ. एस. के. शिंदे, डॉ. अकबर आय. इनामदार, डॉ. गिरीश गुंड, डॉ. आर. सी. पवार, डॉ. उमाकांत एम. पाटील, डॉ. ए. डी. जगदाळे, डॉ. एम. पी. सूर्यवंशी यांचा समावेश आहे.

17 OCT 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत विद्यापीठाचे दहा प्राध्यापक

## पदार्थविज्ञानच्या ४ शिक्षकांसह २५ माजी विद्यार्थ्यांचा समावेश; स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या क्रमवारीतील मानांकन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. यात शिवाजी विद्यापीठाच्या दहा संशोधकांना मानांकन प्राप्त झाले आहे. पदार्थविज्ञान अधिविभागातील चार संशोधकांसह २५ माजी विद्यार्थ्यांनाही स्थान लाभले आहे. त्यापैकी बहुतेकजण परदेशात पोस्ट डॉक्टरेट करत आहेत. यानिमित्ताने कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.







प्रा. पी. एस. पाटील प्रा. एस. पी. गोविंदवार प्रा ए. व्ही. राव प्रा. जे. पी. जाधव प्रा. के. वाय. राजपुरे







डॉ. एच.एम. यादव डॉ. ए.व्ही. मोहोळकर डॉ. एस.व्ही. ओतारी प्रा के.एम. गरडकर टी.डी. डोंगळे

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गतवर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीत विद्यापीठाच्या संशोधकांना यंदा पुनर्मानांकन लाभले आहे. प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील (पदार्थविज्ञान), प्रा. केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), प्रा. ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), प्रा. एस. पी. गोविंदवार (पदार्थविज्ञान), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनोतंत्रज्ञान), प्रा. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स) यांचा समावेश आहे.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या यादीसाठी १९६० ते २०२२ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांची सार्वकालिन कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांचा विचार करण्यात आला आहे. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल घेतली गेली. शोधनिबंधांची संख्या व दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक काटेकोर निकषांवर आधारित यादी जाहीर केली जाते.

करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. माने, डॉ. बी.आर. संकपाळ, डॉ. दीपक डुबल आणि डॉ. संभाजी एस. शिंदे यांचा समावेश आहे. वार्षिक कामगिरीच्या डेटाबेसमध्ये डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. देवण, डॉ. व्ही. एल. मथे, डॉ. एच. एम. पठाण, डॉ. एस. एम. पवार, डॉ. आर. आर. साळुंखे, डॉ. वाय. एम. हुंगे, डॉ. एस. एस. माळी, डॉ. आर. सी. कांबळे, डॉ. एस. एस. लठ्ठे, डॉ. एन. आर. चोडणकर, डॉ. एस. जे. पाटील, डॉ. एस. के. शिंदे, डॉ. अकबर आय. इनामदार, डॉ. गिरीश गुंड, डॉ. आर. सी. पवार, डॉ. उमाकांत एम. पाटील, डॉ. ए. डी. जगदाळे आणि डॉ. एम. पी. सूर्यवंशी यांनी स्थान मिळविले आहे.

> शिवाजी विद्यापीठातील दहा प्राध्यापक जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत स्थान प्राप्त करतात, त्यामागे सातत्यपूर्ण संशोधकीय परिश्रम आहेत. प्राध्यापक सलगपणाने यादीतील स्थान अबाधित राखू शकले आहेत. ही बाब विद्यापीठास भूषणावह असून नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

17 OCT 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये स्थान प्राप्त केलेल्या शिवाजी विद्यापीठातील संशोधक-प्राध्यापकांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अधिकारी, प्राध्यापक उपस्थित होते.

# जागतिक संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे दहा प्राध्यापक

## स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या क्रमवारीतील मानांकन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या दहा संशोधकांना मानांकन प्राप्त झाले. पदार्थ विज्ञान अधिविभागातील ४ संशोधक आणि २५ माजी विद्यार्थ्यांनी मानांकनाच्या यादीत स्थान मिळविले आहे.

या यादीमध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. केशव राजपुरे, ए. व्ही. राव, एस. पी. गोविंदवार, ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), प्रा. के. एम. गरडकर, हेमराज यादव (रसायनशास्त्र), डॉ. सचिन ओतारी (नॅनो तंत्रज्ञान), प्रा. तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स) यांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या या प्राध्यापकांचा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. विलास शिंदे, अजितसिंह जाधव, अजित चौगुले, श्रीकृष्ण महाजन, सरिता ठकार, एम. एस. देशमुख, आदी उपस्थित होते. यावेळी वेगवेगळ्या विभागाचे संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

### करिअर परफॉर्मन्स यादीतील प्राध्यापक

सार्वकालिक कामगिरीच्या (करिअर परफॉर्मन्स) यादीत प्र-कुलगुरू डॉ. पाटील, डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, सी. डी. लोखंडे, के. वाय. राजपुरे, आर. एस. माने, बी. आर. संकपाळ, दीपक डुबल, संभाजी एस. शिंदे यांचा समावेश आहे. वार्षिक कामगिरीच्या डेटाबेसमध्ये त्यांच्यासह डॉ. ए. व्ही. मोहोळकर, आर. एस. देवण, व्ही. एल. मथे, एच. एम. पठाण, एस. एम. पवार, आर. आर. साळुंखे, वाय. एम. हुंगे, एस. एस. माळी, आर. सी. कांबळे, एस. एस. लट्ठे, एन. आर. चोडणकर, एस. जे. पाटील, एस. के. शिंदे, अकबर आय. इनामदार, गिरीश गुंड, आर. सी. पवार, उमाकांत एम. पाटील, ए. डी. जगदाळे, एम. पी. सूर्यवंशी यांचा समावेश आहे.

17 OCT 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक आघाडीच्या संशोधकांत विद्यापीठाचे दहा प्राध्यापक

## पदार्थविज्ञानच्या ४ प्राध्यापकांसह २५ माजी विद्यार्थ्यांचाही समावेश : विद्यापीठासाठी भूषणावह बाब

प्रतिनिधी
कोल्हापूर

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केली आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या दहा संशोधकांना मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये पदार्थविज्ञान अधिविभागातील ४ प्राध्यापकांसह २५ माजी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यापैकी बहुतेकजन परदेशात पोस्ट डॉक्टरेट करत आहेत. ही विद्यापीठाच्या दृष्टीने भूषणावह बाब आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गतवर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्येही शिवाजी विद्यापीठातील प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, पदार्थविज्ञानचे डॉ. केशव राजपुरे, डॉ. ए. व्ही. राव, डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, जैवरसायनशास्त्र डॉ. ज्योती जाधव, रसायनशास्त्र प्रा. हेमराज यादव, प्रा. के. एम. गरडकर, नॅनोतंत्रज्ञान डॉ. सचिन ओतारी, इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स प्रा. तुकाराम डोंगळे यांचा समावेश आहे. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून या संशोधकांचा विद्यापीठात गौरव केला.



कोल्हापूर : अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीतील मानांकन मिळाल्याबद्दल विद्यापीठातील शास्त्रज्ञांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सरिता ठकार आदी.

**संशोधनातील कामगिरी भूषणावह: कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

विद्यापीठातील दहा शिक्षकांनी जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत स्थान प्राप्त केले. यामागे त्यांचे सातत्यपूर्ण संशोधकीय परिश्रम आहेत. त्यामुळेच सलग या यादीमधील विद्यापीठाचे स्थान अबाधित राखू शकले. ही बाब विद्यापीठास भूषणावह असून नवसंशोधकांना प्रेरणा देणारी आहे.

'स्कोपस' डेटाबेसवर आधारित 'एल्सव्हिअर'ने तयार केलेल्या यादीसाठी १९६० ते २०२२ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा सार्वकालिक कामगिरी आणि वार्षिक कामगिरी अशा दोन निकषांवर विचार केला. २२ विज्ञान विषय आणि १७६ उपविषयांमधील संशोधनाची दखल घेतली आहे.

शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधन पत्रिकेचा दर्जा, शोधनिबंधाला प्राप्त झालेली सायटेशन्स, एकच लेखक असणारे शोधनिबंध, स्वतःची सायटेशन्स वगळून असणारे शोधनिबंध अशा अनेक निकषांवर ही यादी जाहीर केली. सार्वकालिक यादीत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, निवृत्त शिक्षक डॉ. ए. व्यंकटेश्वरा राव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. माने, डॉ. बी. आर. संकपाळ, डॉ. दीपक डुबल, डॉ. संभाजी शिंदे यांचा समावेश आहे. तर वार्षिक डेटाबेसमध्ये डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. देवण, डॉ. व्ही. एल. मथे, डॉ. एच. एम. पठाण, डॉ. एस. एम. पवार, डॉ. आर. आर. साळुंखे, डॉ. वाय. एम. हुंगे, डॉ. एस. एस. माळी, डॉ. आर. सी. कांबळे, डॉ. एस. एस. लट्टे, डॉ. एन. आर. चोडणकर, डॉ. एस. जे. पाटील, डॉ. एस. के. शिंदे, डॉ. अकबर इनामदार, डॉ. गिरीश गुंड, डॉ. आर. सी. पवार, डॉ. उमाकांत पाटील, डॉ. ए. डी. जगदाळे, डॉ. एम. पी. सूर्यवंशी यांचा समावेश आहे. संशोधकांच्या सत्कारावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सरीता ठकार, डॉ. एम. एस. देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

17 OCT 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे दहा प्राध्यापकांना मानांकन

## अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीत आहे समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली असून, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या दहा संशोधकांना मानांकन प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे यामध्ये पदार्थविज्ञान अधिविभागातील चार संशोधकांसह २५ माजी विद्यार्थ्यांनाही स्थान लाभले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गत वर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्येही शिवाजी



**कोल्हापूर : जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये स्थान प्राप्त केलेल्या शिवाजी विद्यापीठातील संशोधक-प्राध्यापकांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह मान्यवर अधिकारी.**

विद्यापीठाच्या संशोधकांना स्थान लाभले होते. यंदाही त्यांना पुनर्मानांकन लाभले आहे. या यादीमध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील (पदार्थविज्ञान), केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), ए. व्ही. राव (पदार्थविज्ञान), एस. पी. गोविंदवार (पदार्थविज्ञान), ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), ए. व्ही. मोहोळकर (पदार्थविज्ञान), प्रा. हेमराज यादव (रसायनशास्त्र), सचिन ओतारी (नॅनोतंत्रज्ञान), के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), तुकाराम डोंगळे (इलेक्ट्रॉनिक मटेरियल्स) यांचा समावेश आहे.

करिअर परफॉर्मन्स अर्थात सार्वकालिक कामगिरीच्या यादीत प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, निवृत्त शिक्षक ए. व्यंकटेश्वरा राव, सी. डी. लोखंडे, अधिविभागप्रमुख के. वाय. राजपुरे, आर. एस. माने, बी. आर. संकपाळ, दीपक डुबल आणि संभाजी एस. शिंदे यांचा समावेश आहे, तर वार्षिक कामगिरीच्या डेटाबेसमध्ये उपरोक्त संशोधकांसह पुढील संशोधकांनी स्थान मिळवले आहे. ए. व्ही. मोहोळकर, आर. एस. देवण, व्ही. एल. मथे, एच. एम. पठाण, एस. एम. पवार, आर. आर. साळुंखे, वाय. एम. हुंगे, एस. एस. माळी, आर. सी. कांबळे, एस. एस. लठ्ठे, एन. आर. चोडणकर, एस. जे. पाटील, एस. के. शिंदे, अकबर आय. इनामदार, गिरीश गुंड, आर. सी. पवार, उमाकांत एम. पाटील, ए. डी. जगदाळे आणि एम. पी. सूर्यवंशी. विद्यापीठात प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांच्यासह के. वाय. राजपुरे, ज्योती जाधव, ए. व्ही. मोहळकर, के. एम. गरडकर, टी. डी. डोंगळे, हेमराज यादव, डॉ. सचिन ओतारी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रभारी कुलसचिव विलास शिंदे, अजितसिंह जाधव, अजित चौगुले, श्रीकृष्ण महाजन, सरिता ठकार, एम. एस. देशमुख, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, धनंजय सुतार आदी उपस्थित होते.

17 OCT 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आटपाडीत मध्यवर्ती युवा महोत्सवास दमदार सुरुवात

## १५७ महाविद्यालये, ३ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**आटपाडी :** श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय हे ग्रामीण भागातील असूनही विद्यापीठाने आमच्यावर विश्वास टाकत मध्यवर्ती युवा महोत्सवाचे संयोजन करण्याची जबाबदारी दिली. या युवा महोत्सवातून तरुणांना दर्जेदार व्यासपीठ देण्याचे काम महाविद्यालयाच्या माध्यमातून केले जाणार असल्याचे प्रतिपादन दि आटपाडी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी केले आहे.

आटपाडी येथे श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे सचिव एच. यू. पवार, निरीक्षक अशोक चौगुले, प्राचार्य डॉ. विजय लोंढे, नीलेश ढामसे, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, पी. एम. माने, सुमनताई नागणे, प्राचार्या योजना जोगळेकर, प्राचार्या विजया चव्हाण, प्रकाश नामदास, डॉ. दत्तात्रय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.



**आटपाडी येथे श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्घाटन विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी अमरसिंह देशमुख, डॉ. विजय लोंढे, एच. यू. पवार, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, नीलेश ढामसे उपस्थित होते.**

अमरसिंह देशमुख म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विविध कलाप्रकारांमध्ये असणारा सहभाग व उत्साह पाहून आम्हालाही ऊर्जा मिळते. असेच नवीन कार्यक्रम आम्ही भविष्यात संस्थेच्या माध्यमातून राबविणार आहोत.

डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, विद्यापीठ कोणताही महोत्सव घेत असताना त्याचे उत्तमरीत्या नियोजन करते. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातून १५ कलाप्रकार सहभागी झाले आहेत. महोत्सवामध्ये ३२ कलाप्रकारांमध्ये तीन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. कोणतीही अडचण आली तरी युवा महोत्सव जोरदारपणे होणार आहे. कोविड काळातही महोत्सव ऑनलाइन झाला. आज प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना सहभाग घेता येत असल्याने प्रचंड उत्साह आहे. प्राचार्य डॉ. विजय लोंढे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय जाधव यांनी आभार मानले.



**शिवाजी विद्यापीठ; ४२ वा मध्यवर्ती युवा महोत्सव**

### पावसातही उत्साह

महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पावसाने हजेरी लावली. तासाहून अधिक काळ जोरदार पाऊस झाला; पण यातही विद्यार्थ्यांचा उत्साह कमी झाला नाही.




**आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात सुरू असणाऱ्या शिवाज़ी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये रविवारी विद्यार्थ्यांनी मूकनाट्य सादर केले.**

## तरुणाईची धमाल; अभिनय, लोककलांची रंगत

लक्ष्मण सरगर

लोकमत न्यूज नेटवर्क

**आटपाडी :** आटपाडीच्या देशमुख महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या महोत्सवामध्ये रविवारी तरुणाईने धमाल केली. लोककला, लघुनाटिका व एकपात्री अभिनयाने महोत्सवात रंगत आणली. यामध्ये एकूण १५७ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.

रविवारी सकाळी उद्घाटनानंतर अकरा रंगमंचाद्वारे विविध कलाप्रकार सादर करण्यात आले. दिवसभरात ९ भारतीय समूहगीते, ९ मूकनाट्य, ९ नकला, ९ लोककला, ९ लघुनाटिका, ७३ एकपात्री अभिनय, ३ सुगम गायन, २६ शास्त्रीय गायन, ९ पथनाट्ये, ९ मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा, ९ वाद विवाद स्पर्धा, ५५ व्यंगचित्रे, ४८ कातरकाम, १०६ मेहंदी, ११६ रांगोळी, ९ प्रश्नमंजूषा, ४५ शास्त्रीय नृत्य, आदी कलाप्रकार सादर करण्यात आले.

एकपात्री अभिनयाचे सादरीकरण शंकरराव खरात रंगमंचावर करण्यात आले. यामध्ये विविध सामाजिक विषयांवर प्रकाश टाकत असताना सध्या देशामध्ये चालू असणाऱ्या घडामोडी, कौटुंबिक हिंसा, सामाजिक विषय, महिला-मुलींवर होत असणारे अन्याय, मुलगा-मुलगी भेदभाव, महाराष्ट्रातील राजकारणासह विविध ज्वलंत विषयावर भाष्य करणारे एकपात्री अभिनय सादर करण्यात आले.

विविध राजकारणी, अभिनेत्यांच्या नकला करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रंगमंचावरून लोककलांचे सादरीकरण करताना आजकाल लोप पावत चाललेल्या लोककलांची अनोख्या पद्धतीने मांडणी केली. पहाटेपासून सुरू होणाऱ्या ते रात्री झोपेपर्यंत असणाऱ्या ग्रामीण भागातील विविध लोककला विद्यार्थ्यांनी सादर केल्या. उपस्थितांनी त्यांना उत्स्फूर्त दाद दिली.

पुण्यनगरी


# विद्यापीठात डॉ. अब्दुल कलाम जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

पुढारी

# उपकुलसचिव संजय कुबल यांना राज्यशास्त्रातील पीएच.डी.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव संजय मोहन कुबल यांना मानव्यशास्त्र विद्याशाखेतंर्गत पीएच.डी. पदवी जाहीर झाली. कुबल यांनी राज्यशास्त्र विषयामध्ये 'महाराष्ट्रातील राजकीय



विचारांतील शेतीप्रश्नाचे चर्चाविश्व' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. यात महात्मा जोतीराव फुले, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी वि. रा. शिंदे आणि शरद जोशी यांचा शेती व शेतकरी, शेतकरी संगठन, शेतकऱ्यांप्रती सरकार व शासन यांची कर्तव्ये आदी बाबींविषयी आर्थिक, सामाजिक व राजकीय विचार तसेच संकल्पना यांचा तौलनिक अभ्यास केला आहे. डॉ. प्रकाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले.

लोकमत

# एमबीए परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी हितास्तव फेर प्रवेश परीक्षा आयोजित केली आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे केले. एम. बी. ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करायचा आहे. त्यांनी गुरुवार (दि. २०) पर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज भरावेत आणि दि. ३० ऑक्टोबरला प्रवेश परीक्षा द्यावी, असे आवाहन डॉ. बनसोडे यांनी केले.

पुढारी

# विद्यापीठात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कार्यरत यूजीसी स्किम फॉर पर्सन व्हिथ डिसॅबिलिटीज व मध्यवर्ती रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थी बैठक संलग्नित महाविद्यालयांतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. स्कायलार्क ग्लोबल बीपीओ सर्व्हिसचे संस्थापक कैलास मेढे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. महाराष्ट्र शासन पुरस्कृत उद्योजकता विकास केंद्राच्या प्रशिक्षिका गंधाली दिंडे, सायबर कॉलेजच्या प्रा. उर्मिला चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. गजानन राशीनकर यांनी आभार मानले.